शेतकऱ्याची टोपी कोणी घेतली?

लेखक: जोन, मराठी: अश्विनी बर्वे

शेतकऱ्याच्या जवळ एक टोपी होती, जुनी तपकिरी रंगाची.
त्याचे त्याच्या टोपीवर खूप प्रेम होते.

मग एक हवेचा झोत आला आणि टोपी घेऊन गेला.

मग शेतकरी टोपीच्या मागे धावला,

पण हवा त्याच्याहून खूप वेगात वाहत होती.

म्हणून शेतकरी टोपीच्या शोधात निघाला.



त्याने इथे तिथे बघितले.

त्याने सगळीकडे बघितले पण जुनी तपकिरी टोपी सापडली नाही.

मग त्याल एक खार दिसली.

“खारुताई तू माझी तपकिरी टोपी बघितली का?” शेतकऱ्याने विचारले.

"नाही," खार म्हणाली.

पण मी आत्ता आकाशात एक

तपकिरी रंगाचा जाडसर पक्षी बघितला.

बिनापंखाचा पक्षी”

मग शेतकऱ्याला एक उंदीर दिसला.
"उंदरा तुला माझी तपकिरी रंगाची
जुनी टोपी दिसली का?" शेतकऱ्याने विचारले.

“नाही” उंदीर म्हणाला.
“पण मी गवतावर तपकिरी रंगाचे बीळ बघितले,
मी जवळ जाऊ लागलो
तर ते निघून गेले.”

मग शेतकऱ्याला एक माशी दिसली.
माशे तुला तपकिरी रंगाची
जुनी टोपी दिसली का?”
शेतकऱ्याने विचारले.



"नाही," माशी म्हणाली.
पण मी आत्ता एक तपकिरी रंगाची
टेकडी पाहिली होती.
ती त्या झाडावर होती,
मी तिकडे गेले तर
ती निघून गेली.

मग शेतकऱ्याला एक शेळी दिसली.

त्याने शेळीला विचारले

“तू तपकिरी रंगाची जुनी टोपी दिसली का?”

.

“नाही” शेळी म्हणाली.
“पण मी एक तपकिरी रंगाची
एक फुलदाणी बघितली.
जेव्हा मी ती खायला गेले आणि एक
फुंकर मारली तर ती उडून गेली.”

मग शेतकऱ्याला एक बदक भेटले.

“तू तपकिरी रंगाची जुनी टोपी पाहिली का?” शेतकऱ्याने विचारले.

"नाही," बदक म्हणाले.
“पण मी एक लहान गोल बोट तरंगत जातांना पाहिली.
एक पक्षी ती घेऊन गेला..”

मग शेतकरी त्या पक्षाला भेटला.
"तू माझी जुनी तपकिरी रंगाची टोपी बघितली का?" शेतकऱ्याने विचारले.



"नाही," पक्षी म्हणाला,

“पण मी एक गोल, तपकिरी रंगाचे घरटे बघितले.

पण टोपी नाही.”



मग शेतकरी झाडावर चढला.
आणि त्याला जुनी
तपकिरी रंगाची टोपी दिसली.



त्या घरट्याच्या आत एक पक्षी बसलेले होता, त्यात एक अंडं होते. “ओहो व्वा!” शेतकरी म्हणाला.



"आवडलं का?" पक्ष्याने विचारले.

"हो," शेतकरी म्हणाला.

"हो, मला ते छान गोल तपकिरी घरटे आवडले. ते माझ्या जुन्या तपकिरी टोपीसारखे दिसते.

"पण मला दिसतंय की ते एक छान गोल तपकिरी घरटे आहे."



मग शेतकऱ्याने नवीन तपकिरी रंगाची टोपी खरेदी केली.

त्याला ती नवीन तपकिरी टोपी खूप आवडली.



जसे पक्ष्याला तपकिरी रंगाचे
गोल घरटे आवडले तशीच.

ओहो शेतकऱ्याच्या टोपीकडे बघा.

वारा परत वाहायला लागला आहे.

आणि त्याने टोपी उडवली आहे. आता काय होईल?

एक मजेशीर गंमत घडेल.